# चित्तसद्बोधनक्षत्रमाला

कुसंगाश्रयें बा स्वयें आत्मघात । तुवां सत्य केला कुशीला खचीत ।।
अध:पात येईल मत्ता स्वचित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। १ ।।

भला लाधला हा तुला श्रेष्ठ देह । परी ठेविला व्यर्थ तूं येथ मोह ।।
अहंकारयोगें घडे घात चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। २ ।।

अहंकारयोगें घडे कर्तुतादि । अहंकारयोगें घडे भोक्तृतादि ।।
अहंकारयोगें ममत्वादि चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। ३ ।।

अहंकार हा आत्महा खालिं नेतो । अहंकार हा ज्ञानहा ऊर्ध्व नेतो ।।
अहंकार सोडूनि दे शीघ्र चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। ४ ।।

अहंकारयोगें घडे कोप ताप । अहंकारयोगें घडे पापलेप ।।
अहंकारयोगें जगीं घात चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। ५ ।।

अहंकार हा धर्महा शत्रु आहे । अहंकार हा पापहा मित्र आहे ।।
अहंकार सात्वीक हो मित्र चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। ६।।

अहंकार हा बोलिजे त्रिप्रकार । अहंकार हा बंध दे द्विप्रकार।।
तयाचा करी तूं प्रतीकार चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। ७।।

शरीरादिकीं जो अहंकार थोर । अती घोर तोची तमाचा विकार।।
भ्रमालस्यतंद्रादि दे तोचि चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। ८।।

सदा क्रोधलोभप्रयत्नादि दे जो । सदा पातकोत्पत्ति येथें करी जो ।।
तया राजसा सर्वथा सोडि चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। ९।।

तुला लाधलें हें भलें मुक्तिपर्व । परी अंतरी तूं धरीसी कुगर्व ।।
तुझे षड्रिपू घातकी होति चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। १०।।

तुला खंडिती मुंडिती याम्य दूत । तुला दंडिती फाडिती होसि भूत ।।
प्रभूतश्रमें कष्टता कोण त्राता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। ११।।

दुराशा धरूनी तुवां पाप केलें । तयाच्या नियोगें तुला जन्म आले ।।
असें पूढती पूढती होय चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। १२।।

सुत स्त्री स्व माझें असें हें ममत्व । तसें मांस पिंडावरी ही अहंत्व ।।
तुवां ठेविल्यानें तुला दु:ख चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। १३।।

कुणाचे सुत स्त्री कुणाची विचारी । कुणाचें धनक्षेत्र होई विचारी ।।
विचारांतिं मिथ्याचि हो सर्व चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ।। १४।।

ममत्वें सुतादीक हे आदरावे । जयानें तयानें भ्रमानें मरावें ॥
पुढेंही तसें होतसें खास चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ १५॥

तुला या भ्रमें सद्गती लोकिं हो कीं । नको आदरूं प्रेमसंबंध लोकीं ॥
सुख स्वप्नवत्तुच्छ हें सोड चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ १६॥

नको मानपूजेचि लोकांत इच्छा । प्रतिष्ठाहि विष्ठासमानाचि तुच्छा ॥
न पृच्छा करीं व्यर्थ तूं लोकिं चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ १७॥

सुविद्वान् धनी मी गुणी मानि मोठा । असा तूं न ठेवी वृथा गर्व ताठा ॥
नमीं सर्व भूतांसि हो लीन चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ १८॥

नको होउं तूं लोकनिंदेस पात्र । नको लोकनिंदा करू हो सुपात्र ॥
पवित्र प्रभूच्या कृपेला सुचित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ १९॥

जनीं निंद्य तें सोडितां योग्यता ये । जनी वंद्य तें सेवितां योग्यता ये ॥
जनीं वंद्यता तूं न इच्छीं सुचित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ २०॥

सदा संगती दुर्जनांची त्यजावी । सदा संगती सज्जनांची धरावी ॥
धरावी गुरूसेवनीं प्रीति चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ २१॥

सदा सत्त्ववृत्ती धरोनी असावें । सदा सात्विकांमाजिं यत्नें बसावें ॥
बसावें न त्या स्त्रैणपंक्तीस चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ २२॥

भ्रमालस्यनिद्रादिकांते त्यजावें । हरीकीर्तनी प्रेम निःसीम व्हावें ॥
मनीं आळवावें हरीला सुचित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ २३॥

कथाकीर्तनीं अंगिं रोमांच यावे । गळा दाटुनी नेत्र दोनी गळावे ॥
पळावें वपुर्भान भावेंचि चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ २४॥

असें सात्विक प्रेम येतां अहंता । गळे तैं टळे सर्व संसारचिंता ॥
हरीच्या प्रसादें मिळे मुक्ति चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ २५॥

गुरू देव हे एक मानूनि भक्ती । तयांची करी त्या करीं येइ मुक्ति ॥
सुयुक्ती असी ही धरी नित्य चित्ता । त्वरें आदरें तूं स्मरें नित्य दत्ता ॥ २६॥

असी चित्तसद्बोधनक्षत्रमाला । गळा घालिती ते न भीतील काळा ॥
बळां मुक्ति घालील रत्नांचि माळा । गळां त्यांचिया जी न पाहील वेळा ॥ २७॥

॥ इति श्री.प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वतीकृता चित्तसद्बोधनक्षत्रमाला संपूर्णा ॥

*******